**लोकशाही अधिकारांवर एन डी ए सरकार तर्फे होत असलेल्या आक्रमणाच्या विरोधात स्वयंसेवी संस्था व संघटनांचा निषेध**

पुणे एप्रिल २१, २०१५ आज पुण्यातील अनेक स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींनी ग्रीनपीस इंडिया सारख्या सामाजिक संस्थांवर एन डी ए सरकार कडून होत असलेल्या हल्ल्याच्या विरोधात निषेध नोंदवला. १८० सामाजिक, स्वयंसेवी संस्थांनी व नागरिकांनी लिहिलेले या बाबतचे जे निषेध पत्र केन्द्रीय गृहमंत्रीश्री राजनाथ सिंह यांना आज पाठवले आहे, ते सोबत जोडलेले आहे. सामाजिक न्याय, पर्यावरणीय सातत्य व वंचितांचे अधिकार यांबाबत मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या या देशात होणारी ही सरकारी मुस्कटदाबी लाजिरवाणी आहे असे पुण्यातील संस्थांनी जाहीर केले.

" केंद्र सरकारनी ग्रीनपीस इंडिया संस्थेची बँक खाती गोठवली व त्यांचे निधीचे स्रोत गोठवले. या कारवाईने अभिव्यक्ती स्वातंत्र्य व संघटीत होण्याचे स्वातंत्र्य या घटनात्मक अधिकारांची पायमल्ली होत आहे. देशाचे विकास धोरण व प्राधान्यक्रम यांपेक्षा भिन्न अशी स्वयंसेवी संस्थांची मते खपवून घेतली जाणार नाहीत, असा इशारा यातून प्रतीत होत आहे," असे पुण्यातील कल्पवृक्ष संस्थेचे अशीष कोठारी म्हणाले.

"सरकारी विकास धोरणापेक्षा भिन्न मते मांडणे, तसेच, जे जनसमुदाय या धोरणामुळे विस्थापित होणार आहेत, त्याना संघटीत होण्यास मदत करणे, व पर्यावरणाच्या रक्षणासाठी जनमत तयार करणे, हे काही देश विरोधी कार्य नाही, हे जनहिताच्या विरोधातही नाही. पर्यावरणाचे संरक्षण करणे व मानवी हक्क अबाधित राखणे ही तर घटनेनेच नेमून दिलेली नागरीकांची मूलभूत कर्तव्ये आहेत," असे मंथन संस्थेचे श्रीपाद धर्माधिकारी म्हणाले.

"खाणकाम, ऊर्जा व अन्य प्रकल्प यांना सरकार जी चालना देत आहे, त्यामुळे सातत्यपूर्ण विकासाचे जे सरकारचे धोरण आहे, त्याबाबतच प्रश्नचिन्ह उभे रहात आहे." असे सोपेकॉम संस्थेचे के जे जॉय म्हणाले.

या व अन्य स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते - परिसर संस्थेचे सुजित पटवर्धन, SANDRP च्या परिणीता दांडेकर, लोकायतचे नीरज जैन, National Society for Clean Cities चे सतीश खोत व सजग नागरिक मंचचे जुगल राठी यांनी सरकारला असे आवाहन केले की सरकारने ही बेकायदेशीर, अयोग्य, दडपशाहीची कृती त्वरित मागे घ्यावी व प्रत्यक नागरिकाचा घटनात्मक अधिकार असलेले अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित राखावे.

लोकायतचे नीरज जैन म्हणाले की "हा केवळ ग्रीनपीसला गप्प बसवण्याचा प्रयत्न नाही, तर लोकशाहीच्या मुळावरच घाव आहे. जे लोक अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे महत्त्व जाणतात, व जनविरोधी व पर्यावरणविरोधी धोरणे आणि कार्यक्रमांना विरोध करण्याचे महत्त्व जाणतात, त्या सर्वांना या लढ्यात

सामील होणे आवश्यक आहे. या सरकारला आपण जर ग्रीनपीसला गप्पा करू दिले, तर उद्या ते इतरांच्या मागे येतील, याची खात्री बाळगा. स्वयंसेवी संस्थांची मुस्कटदाबी करण्यामुळे मूळ सामाजिक व पर्यावरणीय अन्यायाचा प्रश्न तसाच प्रलंबित राहतो. आपण अशा प्रकारांना भीक घालता कामा नये.”

संपर्क : अशीष कोठारी, chikikothari@gmail.com, 25675450
श्रीपाद धर्माधिकारी, manthan.shripad@gmail.com, 9552526472
सुजाता पद्मनाभन, 8805246225